महाराष्ट्र शासन

# कला संचालनालय

सर ज.जी. कला शाळा आवार, डॉ.दा.नौ.मार्ग, मुंबई-४०० ००१, दूरध्वनी २२६२०२३१/२

क्रमांक:-डिओए-२०२१/दोन/104

दिनांक: 19 JAN 2021

प्रति,

अधिष्ठाता व प्राचार्य,
शासकीय, शासनमान्य अशासकीय अनुदानित
व विनाअनुदानित/कायम विनाअनुदानित कला संस्था, (महाराष्ट्र राज्य)

विषय:- शैक्षणिक सत्र २०२०-२०२१ (पदविका अभ्यासक्रम)
दीर्घसुट्टया व सत्रसमाप्तीबाबत..

कोविड-१९ च्या प्रादुर्भावामुळे कला संचालनालयाच्या अधिपत्याखालील शासकीय, शासनमान्य अशासकीय अनुदानित, विनाअनुदानित/कायम विनाअनुदानित कला संस्थामध्ये शैक्षणिक वर्ष २०२०-२१ चे ऑनलाईन अध्यापनाबाबत अध्यापकांनी दिलेले निवेदन तसेच निरीक्षक यांच्या दि.१०.०८.२०२० रोजीच्या पत्रास अनुसरुन अध्यापनाचे कार्य ऑनलाईन पध्दतीने सुरु आहे. त्यास अनुसरुन शैक्षणिक वर्ष २०२०-२१ (पदविका अभ्यासक्रम) चे दीर्घसुट्टया व सत्रसमाप्तीबाबत रुपरेषा ठरविण्यासाठी कला संचालकांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीमध्ये घेतलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने कला संचालनालयाच्या अधिपत्याखालील शासकीय, शासनमान्य अशासकीय अनुदानित, विनाअनुदानित/कायम विनाअनुदानित कला संस्थांना खालील प्रमाणे कळविण्यात येत आहे.

१) कला संचालनालयाच्या अधिपत्याखालील सर्व शासकीय, शासनमान्य अशासकीय अनुदानित व विनाअनुदानित/कायम विनाअनुदानित कला संस्थामध्ये कला संचालनालयाचे पत्र दि.२४.०८.२०२० अन्वये दि.०१ सप्टेंबर, २०२० पासून कोविड-१९ च्या परिस्थितीमुळे ऑनलाईन शिकविण्यात येणाऱ्या पदविका अभ्यासक्रमांसाठी तसेच कला संचालनालयाचे दि.०८ आक्टोबर, २०२० च्या परिपत्रकान्वये कळविल्यानुसार शिकविण्यात येणाऱ्या पदविका अभ्यासक्रमांसाठी प्रत्येक शनिवार प्रविष्ठ करुन खालील प्रमाणे कामाचे दिवस असतील.

| महिना | कामाचे दिवस |
|---|---|
| ०१ सप्टेंबर, २०२० ते ३० सप्टेंबर, २०२० | २६ |
| ०१ आक्टोबर, २०२० ते ३१ आक्टोबर, २०२० | २५ |
| ०१ नोव्हेंबर, २०२० ते १२ नोव्हेंबर, २०२० | १० |
| १३ नोव्हेंबर, २०२० ते २२ नोव्हेंबर, २०२० | दिवाळी सुट्टी |
| २३ नोव्हेंबर, २०२० ते ३० नोव्हेंबर, २०२० | ७ |
| ०१ डिसेंबर, २०२० ते ३१ डिसेंबर, २०२० | २६ |
| ०१ जानेवारी, २०२१ ते ३१ जानेवारी, २०२१ | २५ |
| ०१ फेबुवारी, २०२१ ते २८ फेबुवारी, २०२१ | २३ |
| ०१ मार्च, २०२१ ते ३१ मार्च, २०२१ | २५ |
| ०१ एप्रिल, २०२१ ते ३० एप्रिल, २०२१ | २२ |
| एकूण | १८९ |
| स्थानिक सुट्टया | ३ |
| एकूण कामाचे दिवस | १८६ |

दि.०८ आक्टोबर, २०२० च्या पत्रान्वये कळविल्यानुसार ऑनलाईन शिकविण्यात येणाऱ्या पदविका अभ्यासक्रमांसाठी कामाचे दिवस भरून काढण्यासाठी आवश्यकतेनुसार सुट्टीच्या दिवशी कामाचे दिवस पूर्ण करण्यात यावेत.

SMP/SATRARAMBHA SATRASAMAPTI

२)	या संचालनालयाचे पत्र दि.०१.०१.२०२१ अन्वये कळविल्यानुसार दि.०४ जानेवारी, २०२१ पासून कोविड-१९ च्या परिस्थितीमुळे ऑनलाईन शिकविण्यात येणाऱ्या पदविका अभ्यासक्रमांसाठी प्रत्येक शनिवार प्रविष्ठ करुन खालील प्रमाणे कामाचे दिवस असतील.

| महिना | कामाचे दिवस |
|---|---|
| ०४ जानेवारी, २०२१ ते ३१ जानेवारी, २०२१ | २३ |
| ०१ फेबुवारी, २०२१ ते २८ फेबुवारी, २०२१ | २३ |
| ०१ मार्च, २०२१ ते ३१ मार्च, २०२१ | २५ |
| ०१ एप्रिल, २०२१ ते ३० एप्रिल, २०२१ | २२ |
| ०१ मे, २०२१ ते ३१ मे, २०२१ | २३ |
| ०१ जून, २०२१ ते ३० जून, २०२१ | २६ |
| एकूण कामाचे दिवस | १४२ |

उक्त तक्त्यातील एकूण कामाचे दिवस १४२ आहेत. तथापि, संबंधित सर्व कला महाविद्यालयांनी आपल्या सोयीनुसार कामाचे तास वाढवून किंवा सुट्टीच्या दिवशी अध्यापन सुरु ठेऊन कामाचे एकूण दिवस तसेच अभ्यासक्रम पूर्ण होईल याची खबरदारी घ्यावी. पुढील शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये कला संचालनालयाच्या अधिपत्याखालील पदविका अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रियेचा विचार करिता, जून, २०२१ सत्र समाप्त करणे आवश्यक आहे.

३)	वरीलप्रमाणे १ सप्टेबर, २०२० व ८ आक्टोबर, २०२० पासून सुरु झालेल्या अभ्यासक्रमांचे कामकाज ३० एप्रिल, २०२१ पर्यंत पूर्ण होत आहे. तथापि, १ मे, २०२१ ते ३१ जूलै, २०२१ पर्यंत महाविद्यालयाच्या अंतर्गत परीक्षेचे निकाल तयार करणे, शैक्षणिक वर्षाचे कामकाजाचे नियोजन करणे, उच्च कला परीक्षेचे कामकाज करणे, नवीन शैक्षणिक वर्षात शिकविण्यासाठी विषयाची पूर्वतयारी करण्याकरिता तसेच प्राचार्यांनी सोपविलेली इतर तद्नुषंगिक कामे करण्यासाठी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी महाविद्यालयात उपस्थित राहणे आवश्यक आहे. तसेच दि.०४.०१.२०२१ पासून सुरु झालेल्या अभ्यासक्रमाचे कामकाज ३० जून, २०२१ पर्यंत पूर्ण होत आहे. त्यामुळे उक्त कामे पूर्ण करण्यासाठी सदर शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी दि.३१ जूलै, २०२१ पर्यंत महाविद्यालयात उपस्थित राहणे आवश्यक आहे.

४)	उक्त या संचालनालयाचे पत्र/परिपत्रक दि.२४.०८.२०२०, दि.०८.१०.२०२० व ०१.०१.२०२१ मधील अटींचे काटेकोरपणे पालन होईल याची दक्षता घ्यावी. तसेच शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये प्रत्यक्ष कला महाविद्यालये सुरु करण्याबाबत कोव्हिड-१९ परिस्थिती पाहून यथावकाश कळविण्यात येईल.

(राजीव मिश्रा)
कला संचालक
कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
मुंबई

प्रत,माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
१)निरीक्षक, चित्रकला व शिल्प, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२)परीक्षा नियंत्रक,कला संचालनालय,महाराष्ट्र राज्य,मुंबई.
३)सहायक निरीक्षक,चित्रकला व शिल्प विभागीय कार्यालय,नागपूर.
४)सहायक निरीक्षक,चित्रकला व शिल्प विभागीय कार्यालय,औरंगाबाद.
५)कार्यासन अधिकारी, कार्यासन क्रमांक:-तीन/पाच यांना माहितीसाठी अग्रेषित.

SMP/SATRARAMBHA SATRASAMAPTI